1/6

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स : २२६९२१०२/२२६९०००७.
तार - EDUTECH E-mail : desk4a@dte.org.in Internet :http/www.dte.org.in

**परिपत्रक** क्र. ४-अ/आस्था/२०१२/बदली/८८९१

**कालमर्यादा दि १६.०१.२०१२ (प्राचार्यांसाठी)** दिनांक : 21 दिसम्बर DEC 2011
**दि २१.०१.२०१२ (सहसंचालकांसाठी)**

प्रति,

१) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

२) उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय,
पुणे, औरंगाबाद, नागपूर.

३) प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

**विषय :- शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांबाबत...**

संदर्भ :- शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्याकरीता सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.

शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांसदर्भात संदर्भांकित अध्यायदेशान्वये निश्चित केलेल्या धोरणानुसार दिनांक ३१.०५.२०१२ रोजी एकाच ठिकाणी एकाच पदावर किंवा एकापेक्षा जास्त पदावर ३ वर्षे सेवा पूर्ण करणारे कर्मचारी / अधिकारी बदलीस पात्र ठरतात. म्हणून आपल्या कार्यालयात / संस्थेत दिनांक ३१.०५.२०१२ रोजी ३ वर्ष सेवा पूर्ण करणा-या अध्यापकांची माहिती सोबतच्या विहित प्रपत्रात खालील सुचना विचारात घेऊन दिनांक १६.०१.२०१२ पर्यंत DV-TTNatraj या फॉन्टमध्ये excel sheet वर तयार करुन dte4a@rediff.com या पत्यावर मेल करावी.

१) बदलीसाठी संबंधितांना वैयक्तीक पसंतीची ३ ठिकाणे कळविण्याची सूचना देऊन त्याप्रमाणे माहिती सादर करण्यात यावी. मात्र ज्या अध्यापकांनी बदलीसाठी पसंतीची ठिकाणे दिली नाहीत किंवा ३ पेक्षा कमी ठिकाणे नमूद केली त्यांची बदली प्रशासकीय दृष्टीने इतरत्र करण्यात येईल याची त्यांना जाणीव करुन द्यावी.

आ-१ कार्यवाही करावी

91834 26 DEC 2011

C:\Users\desk4a\Desktop\govt poly trans 2012\Lecturer tranfircular 2012.doc

२) शासन धोरणानुसार पती-पत्नी दोघे शासन सेवेत असल्यास व त्यांची एकाच ठिकाणी बदली करावयाची असल्यास, संबंधित जेथे कार्यरत आहेत त्या कार्यालयाचे ते कार्यरत असल्याबद्दलचे संबंधित कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र लेखी स्वरुपात पुरावा म्हणून सादर करण्यात यावेत.

***३) आपल्या तंत्रनिकेतनांत/कार्यालयात कार्यरत असलेल्या अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांच्याबाबतीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत अथवा त्यांचा शैक्षणिक संपादणुक अहवाल प्रतिकुल आहेत अशा अध्यापकांची बदली करणे आवश्यक आहे किंवा कसे? याबाबत आपले स्पष्ट अभिप्राय कळविण्यात यावेत.***

४) ज्या अध्यापकांनी विनंती बदलीसाठी अर्ज केले आहेत अशा अध्यापकांची माहिती व त्यांचे विनंती बदलीचे अर्ज संस्थाप्रमुख / विभागप्रमुखांमार्फत त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्तावासोबत सादर करण्यात यावेत. तसेच ज्या अध्यापकांनी त्यांच्या स्वतःच्या तसेच कुटुंबातील व्यक्तींच्या वैद्यकीय कारणास्तव विनंती बदलीसाठी अर्ज करीत असतील तर त्यांच्या अर्जासोबत वैद्यकीय कागदपत्रे (केवळ एक प्रमाणपत्र नव्हे) पुरावा म्हणून देणे आवश्यक आहे.

५) ज्या अध्यापकांची पाल्ये १०-१२ वीत असल्याने तुर्तास त्यांची बदली न करण्याबाबत विनंती असल्यास त्याबाबतचे स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवून पुराव्यादाखल आवश्यक कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडावीत.

६) जे अध्यापक नजिकच्या कालावधीत सेवानिवृत्त होत आहेत अशा अध्यापकांच्या नांवासमोर ठळक अक्षरात अभिप्राय देणे आवश्यक आहे.

७) जे अध्यापक पी एच डी / एम ई / एम टेक अशा उच्चशिक्षणासाठी प्रतिनियुक्तीवर असतील तर अशा अध्यापकांच्या नावासमोर प्रतिनियुक्तीचा कालावधी व ते ज्या शैक्षणिक वर्षापासून प्रतिनियुक्त आहेत ते शैक्षणिक वर्ष तसेच दिनांक नमुद करणे अत्यावश्यक आहे.

८) जे अध्यापक अपंग आहेत अथवा ज्यांची मुले अपंग आहेत अशा अध्यापकांनी तसा पुरावा सादर करावा तसे प्राचार्यांनी अभिप्रायामध्ये नमुद करावे.

९) संदर्भीय अधिनियमात दिलेल्या सर्व तरतूदी विचारात घेण्यात येऊन त्या अनुषंगाने बदल्यांची माहिती दिल्याचे तसेच सोबतच्या विवरणपत्रातील माहिती अचूक व सत्य असल्याचे आपण प्रमाणित करुन द्यावे.

१०) अध्यापकांचे विनंती अर्ज व त्यासोबत जोडावयाची प्रमाणपत्रे / पुराव्याची कागदपत्रे / वैद्यकीय कागदपत्रे तसेच तक्रारस्वरुप बदलीबाबत सोबतचे अहवाल / कागदपत्रे हि द्विप्रतीत प्रस्तावासोबत जोडण्यात यावीत.

११) हे परिपत्रक सर्व अध्यापकांच्या निदर्शनास आणावे व विनंती बदलीचे अर्ज नव्याने देण्याबाबत अध्यापकांना सुचना द्याव्यात. ज्या अध्यापकांनी हे परिपत्रक निर्गमीत होण्यापूर्वी विनंती बदलीसाठी अर्ज सादर केले असतील ते गृहित धरण्यात येणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

*१२) जे अध्यापक बदलीसाठी राजकीय दबाव आणतील अशा अध्यापकांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल ही बाब आपल्या संस्थेतील अध्यापकांच्या निदर्शनास आणावी*

तरी, आपणांस कळविण्यात येते की, आपल्या तंत्रनिकेतनांत/कार्यालयात दिनांक ३१.०५.२०१२ रोजी नियमीत / हंगामी / कंत्राटी नियुक्तीने कार्यरत असलेल्या अध्यापकांची माहिती सुध्दा सोबतच्या प्रपत्रात भरुन सादर करण्यात यावी. प्रपत्रातील माहिती ISM-Devnagari मधील DV-TTNatraj या फाँटमध्ये तयार करुन प्राचार्यांनी दिनांक १६.०१.२०१२ पर्यंत सहसंचालकांकडे तर सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयामार्फत या संचालनालयास दिनांक २१.०१.२०१२ पर्यंत निश्चितपणे पाठविण्यात यावी व त्याची १ प्रत या संचालनालयाच्या dte4a@rediff.com या पत्यावर मेल करावी.

या संचालनालयाने वेळोवेळी ईएमआयएस मध्ये अचूक माहिती भरण्याबाबत वारंवार संस्था / कार्यालयांना सुचना दिलेल्या आहेत परंतु अद्यापही काही संस्थांनी त्यांच्या संस्थेत कार्यरत असलेल्या अध्यापकांची माहिती यौग्यरित्या भरलेली नाही ही बाब विचारात घेता पुनश्च सर्व संस्था / कार्यालयांना सक्त सुचना देण्यात येत आहे की सर्व संस्था / कार्यालयांनी आपल्या संस्था / कार्यालयातील सर्व अध्यापकांच्या सेवेबाबतचा तसेच तद्अनुषंगिक सर्व तपशील अचूकरित्या भरावा. सप्टेंबर २०१० पासून संस्थांमध्ये शासनाने सरळसेवेने पदभरतीचे आदेश निर्गमीत केले आहेत. सदर आदेशान्वये रुजू झालेल्या अध्यापकांची माहिती त्वरीत ईएमआयएस मध्ये भरण्यात यावी.

**( दयानंद मेश्राम)**
**सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई**

**पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-१/२०११/** ९९४०
**दि.** 28 DEC 2011

**प्रति,**
**प्राचार्य**, शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर
**उपसचिव**, महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

उपरोक्त पत्रान्वये आपल्या संस्थेतील शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांबाबतची माहिती सोबत जोडलेल्या विहित प्रपत्र अ,ब व क मध्ये DV-TTNatraj या फॉन्टमध्ये Excel-Sheet वर तयार करुन तात्काळ roaurangabad.dte@gmail.com या इमेल आयडीवर मेल करावा. तसेच DV-TTNatraj या फॉन्टमध्ये Excel-Sheet वर असलेली माहितीच स्विकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे

**(महेश शिवणकर)**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

## प्रपत्र अ
## संस्था / कार्यालय

| अक्र | अध्यापकाचे नाव | पदनाम | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | यापूर्वी कार्यरत असलेल्या संस्थांचा पदनाम निहाय तपशील व कालावधी | सध्याच्या संस्थेत कार्यरत असलेला दिनांक व ३१.०५.२०१२ रोजी झालेला एकूण सेवाकालावधी वर्ष / महिने (पूर्णांकात) | | | | प्रशासकीय .बदलीसाठी वैयक्तीक पसंतीची ३ ठिकाणे | विनंती बदलीचे ठिकाण | विनंती बदलीसाठीचे तपशीलवार कारण व त्याबाबतची समर्थनीय कागदपत्रे | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इत्यादी अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतुदीच्या अनुषंगाने संस्था प्रमुखांची / सहसंचालकांची शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पासून | पर्यंत | वर्षे | महिने | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | | | | ८ | ९ | १० | ११ | १२ |

### उपरोक्त प्रपत्र प्राचार्य / विभाग प्रमुख / अधिव्याख्यात्यांचे वेगवेगळे असावे

- ज्या अध्यापकांची मागिलवर्षी बदली झालेली आहे पण अद्यापपर्यंत त्यांना संस्थेने कार्यमुक्त केलेले नाही अशा अध्यापकांच्या समोर तसे नमुद करुन त्याचे कारण नमुद करावे.
- ज्या अध्यापकांची कोणत्याही प्रकारची तक्रार आहे अशा अध्यापकांच्या नावासमारे तसे नमुद करावे व त्याबाबतची समर्थनीय कागदपत्रे सोबत जोडावीत.
- उच्च शिक्षणासाठी गेलेल्या अध्यापकांच्या नावासमोर उच्च शिक्षणास गेलेले शैक्षणिक वर्ष व दिनांक नमुद करावा तसेच जे अध्यापक सेवाविस्तृत अथवा प्रतिनियुक्तीने विद्यमान संस्थेत प्रत्यक्षात कार्यरत नसतील अशा अधिका-यांचा तपशील एकूण सेवावधी दर्शविताना त्यासर्व नमूद कराव्यात.
- ज्या अध्यापकांची आजारपण, पतीपत्नी एकत्रिकरणाबाबतचे कारण अथवा पाल्याचे १०/१२ इत्यादी शिक्षण या कारणास्तव संस्थेतून बदली करावयाची नसल्यास तसे स्पष्टपणे नमुद करावे.
- कंत्राटी अध्यापकांची माहिती वेगळया प्रपत्रात सादर करण्यात यावी ती उपरोक्त प्रपत्र अ मध्ये समाविष्ट करण्यात येऊ नये.

शासकीय तंत्रनिकेतनातील प्राचार्य, विभाग प्रमुख व तत्सम तसेच अधिव्याख्याता व तत्सम पदांवर कार्यरत असलेल्या अध्यापकांची माहिती

## प्रपत्र ब

| अक्र | शासकीय सेवकाचे नाव | वेतन घेत असलेला पे बँड (एजीपी) | प्रवर्ग | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमीत नियुक्तीचा दिनांक | नियुक्तीचा प्रकार | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवा | कार्यरत असलेल्या पदावर यापूर्वी विविध संस्थेतील सेवाकाळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

कंत्राटी अध्यापकांची माहिती वेगळया प्रपत्रात सादर करण्यांत यावी.

# प्रपत्र क

महाराष्ट्र तंत्रनिकेतन, शिक्षक सेवा गट-अ या संवर्गातील शिक्षकीय पदावर कार्यरत असलेल्या अध्यापकांची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

संस्था / कार्यालयाचे नाव

| पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | | | | रिक्त पदे | भरलेल्या पदावर सध्या कार्यरत असलेल्या अधिका-यांची नावे | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नियमित | न्यायालीयीन हंगामी | कंत्राटी | एकूण | | नियमित | न्यायालीयीन हंगामी | कंत्राटी | |
| प्राचार्य | | | | | | | | | | |
| उपप्राचार्य | | | | | | | | | | |
| विभाग प्रमुख व तत्सम | | | | | | | | | | |
| अधिव्याख्याता व तत्सम | | | | | | | | | | |

- सप्टेंबर २०१० पासून अधिव्याख्यात्यांची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबतचे शासन आदेश निर्गमीत झाले आहेत सदर आदेशातील काही अध्यापकांनी रुजू होण्यासाठी मुदतवाढ मागितलेली आहे. शासनाने ज्या अध्यापकांना मुदतवाढ दिलेली आहे अशा अध्यापकांचे नाव नमुद करुन त्यांच्या नावासमोर मुदवाढ कोणत्या दिनांकापर्यंत आहे तो दिनांक नमुद करावा. तसेच जे अध्यापक संस्थेत रुजू झालेले नाही अशा अध्यापकांच्या बाबतीत अध्यापकाचे नाव / नियुक्ती आदेश क्रमांक व दिनांक तसेच गुणवत्ता क्रमांक नमूद करण्यात यावा. त्याचप्रमाणे संस्थेत बदली झालेले तथापि रुजू न झालेले / व संस्थेतून कार्यमुक्त न झालेल्या अध्यापकांची माहिती अभिप्रायामध्ये नमूद करावी जेणे करुन रिक्त पदांची अचूक माहिती शासनास सादर करणे या संचालनालयास शक्य होईल.

- दिनांक १९.१०.२०१० च्या शासन निर्णयान्वये २०१० मध्ये ७ व २०११ मध्ये शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई / ठाणे / जळगांव / यवतमाळ / नांदेड / सोलापूर या संस्थांमध्ये द्वितीय पाळी सुरु झाली असून सदर द्वितीय पाळीची मंजूर पदांचा समावेश एकूण मंजूर पदांमध्ये करण्यात यावा परंतु मंजूर पदांपैकी किती पदे द्वितीयपाळीसाठी मंजूर आहेत ते ( ) मध्येनमुद करण्यात यावे.